ISSN : 2278-9308

# Sanshodhan Samiksha


*Peer Reviewed International Research Journal*

*Special Issue, Economics & Commerce*

*December-2015*





Chief Editor - Prof. Virag S. Gawande
Editor - Dr. Dinesh Nichit

- Published By -

AADHAR SOCIAL RESEARCH & DEVELOPMENT TRAINING INSTITUTE, AMRAVATI, MS.

Scanned with CamScanner

R.N.I- MAH-R-38527 I S S N- 2278-9308

# Sanshodhan Samiksha

Monthly

**Peer Reviewed International Research Journal**

## Special Issue in Economics & Commerce

## December – 2015

**Chief Editor**

**Prof.Virag S.Gawande**

**Editor**

**Dr. Dinesh W.Nichat**

**Commerce**

**Editor**

**Prof.Dr.Sanjay j. Kothari**

**Economics**

**Published By**

Aadhar Publication – Amravati

( M.S.) India 444604

Scanned with CamScanner

# INDEX

## SECTION (A) - Marathi


| Sr. No | Author | Title of Research Paper | Pg.No. |
|---|---|---|---|
| 1 | प्रा. डॉ. सुरेश आर. वराडे | सुक्ष्मवित्त पुरवठा | 1 |
| 2 | डॉ.श्रीप्रभु चापके<br>प्रा. ए. एन.कांबळे | बुलढाणा जिल्ह्यातील गलिच्छ वस्त्यांमध्ये राहणाऱ्या व्यक्तींचे खर्च विषयक अध्ययन | 6 |
| 3 | डॉ. एन. एल. चव्हाण | भारतातील सेवा क्षेत्राच्या उदयोन्मुख प्रवृत्तीचे विश्लेषणात्मक अध्ययन | 9 |
| 4 | संजीव राधाकृष्ण गायकवाड | वाशिम जिल्ह्यातील आंध आदिवासी जमातीचा परिचय आणि वैशिष्ट्ये-एक अध्ययन | 15 |
| 5 | प्रा.डि.टी.डोंगरे | अविकसीत देशातील दारीद्रय व मापण | 22 |
| 6 | प्रा. कु. ताई बा. उके | सामाजिक सुरक्षा | 25 |
| 7 | डॉ. अर्जुन एस. पाटील | ग्रामीण विकासाची गुरुकिल्ली – ऊर्जाक्रांती | 32 |
| 8 | प्रा.योगिता पांडुरंग चौधरी<br>प्रा.डॉ.पी.आर.चौधरी | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानांव्दारे वरीष्ठ महाविद्यालयांचा विकास - एक अभ्यास | 37 |
| 9 | प्रा. डॉ.शंकर आर. चव्हाण | विशेष आर्थीक क्षेत्राचा ग्रामीण अर्थव्यस्थेवरील प्रभाव | 45 |
| 10 | प्रा.डॉ. निता तिवारी | भारतीय जीवन बीमा निगम | 48 |
| 11 | डॉ. जयमाला रामटेके | ग्रामीण रोजगार आणि विकास | 53 |
| 13 | अभिजीत वसंतराव देशमुख | सहकार क्षेत्राचे धोरण आणि जागतिकीकरण | 55 |
| 14 | प्रा. विनायक व्ही. खांडेकर | भारतीय शेती क्षेत्रात पिक विम्याची आवश्यक्ता पिक विम्याचा इतिहास, फायदे, सद्यास्थिती व अडचणी | 59 |
| 15 | सुनिल ढेरे | शेतकरी आत्महत्या व पुर्नवसनात्मक अध्ययन | 64 |
| 16 | संजय उल्हे | सहकार चळवळीचा विकास व योगदान | 72 |
| 17 | दिलीप शहाळे | गरीबी एक समस्या | 77 |
| 18 | डॉ. दिनेश वा. निचित | पंचवार्षीक योजनांच्या माध्यमातून साकारलेल्या विकासदराचे अध्ययन | 82 |


## SECTION (B) - ENGLISH


| | | | |
|---|---|---|---|
| 19 | Prof.C.M.Tembhurnekar | Role of Electricity Infrastructure in Economic Development of India | 1 |
| 20 | Prof.Aute P.N | Dairy Co-operatives progress & problems | 12 |
| 21 | Dr.P.N.Ladhe | Impact of Communication and Information Technology On Indian Economy | 16 |


Scanned with CamScanner

ISSN - 2278-9308

# विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानांव्दारे वरीष्ठ महाविद्यालयांचा विकास - एक अभ्यास

प्रा.योगिता पांडुरंग चौधरी
अ.र.भा.गरूड कला वाणिज्य
आणि विज्ञान महाविद्यालय, शेंदुर्णी.

प्रा.डॉ.पी.आर.चौधरी
मू.जे.महाविद्यालय, जळगांव

**सारांश :**

शिक्षणाशिवाय माणसाची प्रगती नाही. म्हणून आज प्रत्येकाला प्राथमिक शिक्षण सक्तिचे केले आहे. प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण,उच्च माध्यमिक शिक्षण आणि उच्च शिक्षण या शिक्षणाच्या विविध पातळया विद्यार्थ्यांच्या सार्वांगीन विकासाला मोठया प्रमाणावर हातभार लावित असतात. यातच उच्च शिक्षण ही काळाची गरज बनलेली आहे. उच्च शिक्षण प्रत्येकाने घ्यावे यासाठी शासन अनेक प्रयत्न करीत असते त्यातीलच एक महत्वाचा प्रयत्न म्हणजे महाविद्यालयांना दिले जाणारे अनुदान. महाविद्यालयांना वेगवेगळया योजनांच्या माध्यमातून अनुदान देवून महाविद्यालय, महाविद्यालयीन प्राध्यापक आणि महाविद्यालयीन विद्यार्थी यांचा विकास साधला जातो. सदर अनुदानातून महाविद्यालयांचा होणारा विकास अभ्यासण्यासाठी सदर संशोधन करण्यांत आलेले आहे.

**शब्द :** विद्यापीठ अनुदान आयोग, वरीष्ठ महाविद्याल, विकास

**प्रस्तावना :**

शिक्षण ही आधुनिक काळाची गरज आहे. त्याच अनुशंगाने शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी आज पुर्व प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणा पर्यंत अनेक प्रयत्नांचे पाऊल उचलले जात आहे. शाळेतील शिक्षण असो किंवा महाविद्यालयीन शिक्षण प्रत्येक टप्प्यात विद्यार्थी हित हाच केंद्रित घटक असतो. शिक्षणासाठीच एक महत्वाच साधन म्हणजे महाविद्यालय. महाविद्यालयाची शिक्षणातील जागा महत्वपुर्ण आहे. अशा महाविद्यालयांचा विकास घडवुन आणने ही एक काळाची गरज आहे. विकास घडवून आणण्यासाठी केंद्रशासन, राज्यशासन, मानव संसाधन विकास आयोग, विद्यापीठ अनुदान आयोग तसेच उच्च शिक्षणाशी संबधीत असणा-या विविध संघटना एकत्रीत तसेच स्वतंत्र प्रयत्न करीत असतात. अनुदान हे विद्यापीठ, महाविद्यालये तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणीक गुणवत्ता वाढीसाठी महत्वपुर्ण आहे. अनुदान आणि महाविद्यालये विकास यासंदर्भात सविस्तर विश्लेषणात्मक अध्ययन करण्यांत आलेले आहे.

**संशोधन साहित्याचा आढावा :**

सदर विषयांत संशोधन करण्यासाठी विषयाशी संबंधीत असलेल्या तसेच वेगवेगळया स्वरूपात प्रकाशित झालेले संशोधन लेख, पीएच.डी प्रबंध, विविध मासिके तसेच पांक्षिकांमधील लेख यांचा सखोल विश्लेषणात्मक अध्ययन करण्यांत आले.त्यांचे विश्लेषण पुढील प्रमाणे

Growth & Grants of Deemed Universities in India-Shakil Ahmad(Deputy Registrar, University Of Delhi)

सदर संशोधन लेख हा युनिव्हसिटी न्युजच्या अंक क्र.४६ च्या क्र.३९ पत्रकात पान क्र.१३ पासून सुरू झाला आहे. सदर आठवडयाच्या पत्रक हे सप्टेंबर २९ ते ऑक्टोबर ०५ २००८ या कालावधिसाठी चे आहे. संशोधक हे उप निबंधक दिल्ली विद्यापीठात आहेत. त्यांनी याशिवाय इतर पत्रकातही अनुदानाच्या संदर्भात लेख प्रकाशित केले आहेत. सदर संशोधन लेख हा भारतातील आभासी विद्यापीठांचे अनुदान आणि त्यांची वाढ याच्याशी संबधीत आहे. सुरूवातीच्या प्रास्ताविकात विद्यापीठांचे तिन प्रकार म्हणजे केंद्रिय विद्यापीठ, राज्य विद्यापीठ आणि आभासी विद्यापीठ आहे



Scanned with CamScanner

संशोधनाचा उद्देश देत असतांना भारतातील उच्च शिक्षणातील परिस्थिती ही इतर विकसित आणि विकसनशिल देशांच्या तुलनेत फारच कमी आहे. National knowledge commission ने विद्यार्थ्यांची सहभागीतेचे प्रमाण (Student Enrollment Ratio) १० २०६०७ ते १५ टक्के २०१५ पर्यंत वाढण्याची आवश्यकता सांगितली आहे. मात्र भारतात ही परिस्थीती विपरीत आहे. म्हणूनच विद्यापीठ वाढविण्याची सुदधा गरज आहे. याचसाठी अनुदानाची आवश्यकता असते. यात आभासी विद्यापीठांना १० व्या पंचवार्षिक योजनेत मिळणाया अनुदानाचे अध्ययन करण्यांत आले आहे.

सुरूवातील आभासी विद्यापीठांची स्थापना आणि संख्यात्मक वाढ दाखविण्यांत आली आहे. सन २००२ ०३ ते २००६ ०७ या कालावधीत प्रत्येकवर्षी किती आभासी विद्यापीठ स्थापन झाले याची आकडेवारी क्र. १ च्या तालिकेत देण्यांत आली आहे. त्यानुसारच सन २००६ - ०७ पर्यंत भारतात एकुण १०९ आभासी विद्यापीठ स्थापन झाले आहेत. क्र.२ च्या तालिकेत राज्यांनुसार आभासी विद्यापीठांची संख्या दर्शविण्यांत आली आहे. त्यात महाराष्ट्र राज्यात सार्वाधिक म्हणजे २१ विद्यापीठ स्थापन झाले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाकडुन देण्यांत येणारे अनुदान नियोजित तसेच अनियोजित अशा दोन वेगवेगळया योजनांअंतर्गत देण्यांत येते. त्यात अनियोजित निधी हे पगार आणि भत्ते तसेच सेवानिवृत्तीचे फायदे यासाठी असते तसेच पगाराव्यतिरीक्त खाणे, विजबिल, पाणी बिल, संपत्ती कर, घरकर, अनुषांगिक इमरत दुरूस्थी यासाठी देण्यांत येतो. तर नियोजित निधी विकास अनुदाना अंतर्गत देण्यांत येतो. अस्तित्वात असलेले इन्फास्ट्रक्चर सदृढ करण्यांसाठी , आधुनिक शिक्षणासाठी संशोधन व प्रशासनासाठी तसेच या दोन्हींव्यतिरिक्त महिला वसतिगृह बांधकाम , महिला विद्यार्थीनीसाठी साहित्य , डे केअर सेंटर इ. योजना आहेत. क्र.३ च्या तालिकेत विद्यापीठांना अनियोजित निधी अंतर्गत मिळणारे अनुदान, आभासी विद्यापीठांना मिळालेले अनुदान त्यांची टक्केवारी आणि किती आभासी विद्यापीठांना अनुदान मिळाले याची आकडेवारी देण्यांत आलेली आहे. ही संपुर्ण माहिती २००२ ०३ ते २००६ ०७ अशा वर्षामध्ये विभागून दिलेली आहे. अनियोजित योजने अंतर्गत २००६ ०७ या वर्षी सार्वाधिक म्हणजे १०००३.९८ लाख रू अनुदान आभासी विद्यापीठांना मिळाले. तर नियोजित निधी व्दारे अनुदान मिळविणेची टक्केवारी वर्षानुवर्षे कमी होतांना दिसते. २००२ ०३ ला एकुण अनुदानाच्या ०६.१७ टक्के अनुदान आभासी विद्यापीठांना मिळाले तेच २००६ - ०७ ला २०९३ टक्के पर्यंत खाली आले. एकुण अनुदान १९६६१.२९ लाख प्राप्त झाले.

निष्कर्ष आणि शिफारशिंमध्ये अकराव्या पंचवार्षिक योजनेचे ध्येय जे (Student Enrollment Ratio) १५ टक्याने वाढ करण्याचे आहे. तसेच उच्च शिक्षणाची गुणवत्तेत वाढ तसेच आभासी विद्यापीठांना मान्यता देण्याची आवश्यकता वाटते. कारण त्यांना अनुदान देता येईल व गुणवत्ता वाढीसाठी नियंत्रण ही ठेवता येईल.

सदर संसोधन लेक हा सहा पानांचा असून त्यात भारतातील आभासी विद्यापीठांना दहाव्या पंचवार्षिक योजनेत किती अनुदान मिळाले, आभासी विद्यापीठांची संख्या कशी वाढली, कोणत्या राज्यात किती आभासी विद्यापीठ आहेत यासंदर्भात माहिती दिली आहे. मात्र अनुदान मिळण्याच्या समस्यांसंदर्भात विवेचन करण्यांत आलेले नाही तसेच आकडेवारी सुदधा विनियोगाची देण्यांत आलेली नाही. तरीही संशोधन लेख संशोधन लेखास गती प्राप्त करण्यांत उपयोगी ठरेल.

Higher Education – Approach ,Stategy and action plan in the 11th paln
Vol.47 no.37 September -14-20,2009 – Sukhdeo Thorat

त्रिपुरा विद्यापीठाच्या ७व्या पदवीदान समारंभात दि.१४ फेब्रुवारी २००९ विद्यापीठ अनुदान आयोग चे तत्कालिन अध्यक्ष सुखदेव थोरात यांनी दिलेल्या अभिभाषणाचे लेखात रूपांतर करून ते युनिव्हर्सीटी न्युजच्या अंक क्र.४७ मधिल क्र.३७ च्या जर्नल मध्ये प्रकाशित करण्यांत आला आहे.



Scanned with CamScanner

ISSN - 2278-9308

लेखाच्या सुरवातील शैक्षणिक संस्थांची वाढ १९५० ते २००८ पर्यंत कशी झाली हे दाखविण्यांत आले आहे. प्रथम तालिकेत विद्यापीठाच्या संख्येतील वाढ, महाविद्यालये, शिक्षण तसेच विद्यार्थी एनरोलमेंट प्रमाणातील वाढ दर्शविण्यांत आली. दुसया तालिकेत २००८ ला प्रकारानुसार विद्यापीठांची संख्या दाखविण्यांत आली आहे.

तदनंतरच्या परिच्छेदात एनरोलमेन्ट रेट वाढीचे आव्हाने आणि ११ व्या पंचवार्षिक योजनेसठीचे धोरणे दिलेले आहे. यात ११ व्या पंचवार्षिक योजनेत दोन मोठया समस्या आहेत. एक म्हणजे कमी एनरोलमेन्ट रेट आणि दुसरा म्हणजे प्रादेशिक असमतोल होय. त्यानुसारच वेगवेगळया राज्यात २००४ ०५ ला पदवीधरांचा ग्रॉस एनरोलमेंट रेशो चा आलेख देण्यांत आलेला आहे. क्र. ४ च्या तालिकेत सन २००० ची एन्रोलमेन्ट रेशो आंतर विश्व तुलनात्मक आकडेवारी देण्यांत आलेली आहे. त्यात कन्ट्रीज इन ट्रान्झीशन ३६.५ विकसित राष्ट्र ५४.६, विकसनशिल देश ११.३ आणि जगाची सरासरी २३.२ आहे. त्यानुसारच भारतात ११ व्या पंचवार्षिक योजनेत १५ टक्के पर्यत वाढविण्याचे ध्येय आहे. मात्र ११ व्या पंचवार्षिक योजनेत १५ टक्के वाढीची अपेक्षा हि मागिल ५५ वर्षातील जे १० टक्याने एनरोलमेन्ट रेट वढला त्याच्या निम्मे वाढ अपेक्षित आहे. ११ व्य पंचावार्षिक येजनेत संस्थांची संख्या तसेच क्षमता वाढविण्याचे ध्येय आहे. तसेच इनटेक कपॅसीटी वाढविण्याचे ध्येय आहे. त्यासोबतच प्रादेशिक असातोल दुर करणे आहे. शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या,पहाडी, सिमाभाग आदिवासी भाग, ग्रामीण भाग दुर्बल घटक,अल्पसंख्यांक क्षेत्रात योग्य एनरोलमेन्ट रेट गाठण्यासाठी जास्तिची आर्थिक मदत देण्यांचे ठरविले आहे. निरिक्षणात्मक समारोपात ११ वी योजना यशस्वीहोण्यासाठी म्हणजेच ठरविलेली ध्येय धोरणे पूर्ण होण्यासाठी प्रत्येक राज्यातील सरकारने स्वतःच्या योजना बनवून पुढाकार घेतला पाहीजे. तरच उच्च शिक्षण गुणवत्तापुर्ण होईल.

सदर संसोधन लेख श्री सुखदेवजी थोरात यांच्या भाषणाचा परिपाक आहे. ११ व्या पांचवार्षिक योजनेसाठी तयार होणेसाठी आवश्यक बाबी आणि घटकांचा विचार करण्यांत आलेला आहे. GER वर जास्त भर देण्यांत आला आहे. परंतु ११व्या पंचवार्षिक योजनेतील योजना आणि त्यासाठी केंद्र सरकारच्या मानव संसाधन विभागाने दिलेली रक्कम, रकमेची विभागणी, त्यासंदर्भात संबंधीत घटकांची जबाबदारी अशा महत्वाच्या बाबींचा विचार झालेला नाही. तरी संशोधन लेख हा संशोधन कार्य जे ११ व्या पंचवार्षिक योजनेशी संबंधीत आहे त्यासाठी दिशादर्शक म्हणून महत्वपुर्ण आहे.

अशा संशोधन लेखांमध्ये मिळणारे अनुदान आणि महाविद्यालये तसेच विद्यापीठांचा विकास यास्वरूपाचा सहसंबंध दर्शविण्यांत आलेला आहे.

**संशोधनाचे महत्व ः**

सदर संशोधनातून महाविद्यालयांना मिळाणारे अनुदान, अनुदान मिळविण्याची पदधती, अनुदानाचे प्रकार, अनुदानासाठी ची पात्रता या स्वरूपात महत्वपुर्ण माहिती मिळवून अनुदान जातित जास्त मिळवून त्याचा वापर महाविद्यालयांचा सार्वागीन विकास घडवून आणण्याच्या दष्टीने सदर संशोधन विषयाचे महत्व आहे.

**संशोधनाचे उद्देश ः**

१. विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे मिळणा-या अनुदानाचा अभ्यास करणे.
२. अनुदानाच्या माध्यमातून महाविद्यालयांच्या विकासाचा अभ्यास करणे.
३. अनुदान मिळविण्याच्या पक्रियेचा अभ्यास करणे.
४. अनुदान मिळविण्याच्या तसेच अनुदान विनियोगाच्या पक्रियेतील समस्या शोधुन त्यावर उपाय योजना सुचविणे.

**संशोधनाची गृहितके ः**

१. अनुदानातून वरीष्ठ महाविद्यालयांचा विकास झालेला आहे.



Scanned with CamScanner

२ . अनुदान विनियोगाच्या प्रक्रियेत सुधारणा करण्याची गरज आहे .

**संशोधन पदधती :**

सदर संशोधन हे सहेतूक पदधतीने करण्यांत आलेले असून पुढील प्रमाणे माहितीचे संकलन करण्यांत आलेले आहे .

१ . **प्रथमिक माहिती :** संशोधनासाठी प्राथमिक माहिती वेगवेगळे पुस्तके, ग्रंथ, मासिके तसेच वर्तमान पत्रातील बातम्या, जर्नल्स मधील संशोधन लेख यांच्या स्वरूपात संकलित करण्यांत आलेली आहे .

२ . **दुय्यम माहिती :** संशोधनासाठी दुय्यम माहिती ही प्रत्यक्ष मुलाखती, प्रश्नावली यास्वरूपात संकलित करण्यांत आलेली आहे .

**माहितीचे विश्लेषण :**

सदर संशोधन हे जळगांव जिल्हयातील वरीष्ठ महाविद्यालयांशी संबधीत असून ११ व्या पंचवार्षिक योजनेत जळगांव जिल्हयातील वरीष्ठ महाविद्यालयांना मिळालेल्या अनुदानातून त्यांचा साध्य झालेला विकास या संदर्भात अध्ययन करण्यांत आलेले आहे .


**जळगांव जिल्हयातील अनुदानित वरीष्ठ महाविद्यालये :** भारतामध्ये २0११ ला ३४९0८ महाविद्यालये आहेत . त्यापैकी महाराष्ट्रात ४६0३ महाविद्यालये असून त्यातील केवळ ११८४ महाविद्यालये कलम १२ (ब), २ (फ) यादी मध्ये अंतर्भुत आहेत . जळगांव जिल्हयांत एकुण ३२ महाविद्यालये १२ (ब), आणि ९ महाविद्यालये व इन्स्टीटयुट २ (फ) यादी मध्ये अंतर्भत आहेत . यापैकी ६0 टक्के महाविद्यालयांचा समावेश संशोधनात करण्यांत आला आहे .

जळगांव जिल्हयातील वरीष्ठ महाविद्यालयांना मिळालेले अनुदान : अकराव्या पंचवार्षिक योजनेत उच्च शिक्षणासाठी केलेली तरतुद ८४९४३ करोड रूपये इतकी होती . त्यापैकी उमवी जळगांव अंतर्गत योणाया महाविद्यालयांना काही योजनांच्या स्वरूपात देण्यांत आलेल्या अनुदानाचे विश्लेषण पुढील प्रमाणे

1. उमवि, जळगांव अंतर्गत येणा-या वरीष्ठ महाविद्यालयांना General Development Assistance या योजने अंतर्गत देण्यांत आलेले अनुदान पुढील प्रमाणे आहे .



Scanned with CamScanner




वरील आलेखावरून General Development Assistance) योजने अंतर्गत सर्वात कमीअनुदान दादासाहेब देविदास नामदेव भोळे महाविद्यालयाला रू. १८७२७२मिळाले आहे. हे अनुदान सार्वाधिक अनुदान प्राप्त करणा-या मू. जे. महाविद्यालय जळगांव यांना मिळालेल्या अनुदाना पेक्षा २१.२५ पटीने कमी आहे. जळगाव जिल्हयातील वरीष्ठ महाविद्यालयांना या योजने अंतर्गत मिळालेले अनुदान हे ४0 लाखांच्या आत असून नऊच महाविद्यालयांना १0 लाख रूपयांपेक्षा जास्त अनुदान प्राप्त झाले आहे. सार्वाधिक अनुदान प्राप्त करणारे तिनही महाविद्यालये तालुक्याच्या ठिकाणी असून NAAC कडुन "A" श्रेणी प्राप्त आहेत. तर सर्वात कमी अनुदान प्राप्त करणारे महाविद्यालय सुदधा तालुक्याच्या ठिकाणी स्थापन झाले आहे. अनुदान योजनेच्या नियमांनुसार आणि दिलेल्या हेड नुसार महाविद्यालयांनी अनुदानाचा विनियोग केला आहे. परंतु सर्व महाविद्यालयांना मिळालेल्या आकडेवारी च्या अभ्यासानंतर असे सांगता येईल कि, जळगांव जिल्हयातील वरीष्ठ महाविद्यालयांच्या अनुदान प्राप्त करण्याच्या प्रमाणात खुप मोठी तफावत आहे.




Scanned with CamScanner

ISSN - 2278-9308

२. उमवि, जळगांव अंतर्गत येणा-या वरीष्ठ महाविद्यालयांना Merged Scheme या योजने अंतर्गत देण्यात आलेले अनुदान पुढील प्रमाणे आहे.

या योजने अंतर्गत एकुण २८ महाविद्यालयांनी अनुदान मिळविलेले आहे. सार्वाधिक अनुदान मिळविणाया महाविद्यालयांमध्ये मू.जे. महाविद्यालय, जळगांव, अ.र.भा. गरूड महाविद्यालय, शेंदुर्णी आणि प्रताप महाविद्यालय, अमळनेर ज्यांना अनुक्रमे रू. ३६१८000, रू. ३३११७८१ व रू. ३११0000 अनुदान मिळाले आहे. यातील मू.जे. महाविद्यालय, जळगांव, प्रताप महाविद्यालय, अमळनेर हे दोघही तालुक्याच्या ठिकाणी स्थापन झालेले असून **NAAC "A"** श्रेणी तसेच **College for Potential Excellence** प्राप्त आहेत. तसेच दोघेही महाविद्यालय जळगांव जिल्हयातील सर्वात जुने महाविद्यालये आहेत. मात्र अ.र.भा. गरूड महाविद्यालय, शेंदुर्णी ग्रामीण भागातील असूनही सार्वाधिक अनुदान मिळविणाया महाविद्यालयांच्या यादीत समावेशीत आहे. याचाच अर्थ या योजने अंतर्गत ग्रामीण किंवा शहरी अशा स्वरूपाची अट अनुदान मिळविण्याच्या प्रमाणात तफावत करीत नाही. कमी अनुदान प्राप्त करणाया महाविद्यालयांमध्ये एस.जी.व्ही.पी. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, खिरोदा आणि कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, बोदवड आणि धनाजी नाना चौधरी महाविद्यालय, फैजपुर यांना अनुक्रमे रू.६२६000 , रू.६३0000 आणि रू.८४५000 अनुदान प्राप्त झाले आहे. याचाच अर्थ या योजने अंतर्गत जळगांव जिल्हयातील वरीष्ठ महाविद्यालयांनी खुप मोठया प्रमाणावर अनुदान प्राप्त केले आहे फक्त तीनच महाविद्यालयांना दहा लाखांपेक्षा कमी अनुदान प्राप्त झाले आहे. तसेच २८ पैकी २५ महाविद्यालयांना दहा लाखरूपायां पेक्षा जास्त अनुदान प्राप्त झाले आहे.






Scanned with CamScanner


ISSN - 2278-9308

**महाविद्यालयांची २००७ ते २०१२ पर्यंतची माहीती ः**

अकरावी पंचवार्षिक योजना ही सन २००७ ते २०१२ या कालावधीसाठी आहे सदर कालावधीत महाविद्यालयांची झालेली प्रगत पुढील प्रमाणे

**विद्यार्थी**

संख्या ः




सदर आलेखात प्राप्त माहितीतील आठ महाविद्यालयांची २००७ ते २०१२ या कालावधीतील विद्यार्थी संख्या दिलेली आहे. सदर कालावधी हा ११ व्या पंचवार्षिक योजनेचा असून त्यात महाविद्यालयांना वेगवेगळया योजनांच्या स्वरूपात अनुदान मिळालेले आहे. याच अनुदानामुळे महाविद्यालयाव्दारे दिल्या जाणा-या सेवा सुविधांमध्ये वाढ होवून विद्यर्थ्यांचा कल महाविद्यालयीन शिक्षण घेण्याकडे वाढलेला दिसतो. वरील आलेखानुसार प्रत्येक महाविद्यालयाच्या २००७ च्या विद्यार्थी संख्येपेक्षा २०१२ ची विद्यार्थी संख्या ही मोठया प्रमाणावर वाढलेली दिसते.विद्यार्थ्यांची संख्या वाढणेवावत महत्वाचे कारण हे अनुदानातली मोठया प्रमाणात वाढ आहे.

**निष्कर्ष ः**

सदर संशोधनावरून असे निदर्शनास येते कि, महाविद्यालयांना दिले जाणारे अनुदान हे महाविद्यालयांच्या विकासात महत्वाची भुमिका वजावते. जळगांव जिल्हयातील महाविद्यालयांना मिळालेल्या अनुदानामुळे महाविद्यालयांव्दारे दिल्या जाणाया सेवा सुविधांमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाली. महाविद्यालयीन संगणक, पुस्तके खेळासाठीची मैदाने या स्वरूपात महाविद्यालयांचा भौतिक स्वरूपात विकास झालेला आहे. सदर विकासामुळेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची महाविद्यालयांतील प्रवेशाची संख्या २००७ २०१२ या कालावधीत वाढलेली दिसते. म्हणुनच अनुदानाची महाविद्यालयांसाठी नितांत आवश्यकता आहे. जेणेकरून उच्च शिक्षणाचा गुणात्मक विस्तार करण्याच्या दृष्टीने अनुदान सहाय्यकारक ठरतील.



Scanned with CamScanner

संदर्भ सुची :
१. डॉ. प्रदिप आगलावे, संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे
२. पुष्प चौदावे संशोधन अहवालाची लेखन पदधती, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक,
डॉ. अनंत जोशी, सौ. संजीवनी महाले
३. "केंदिय अर्थसंकल्प २००८- ०९ शिक्षणासाठीच्या वाटणीचे निरिक्षण"
४. Finances of central universities of Delhi : A comparative study
Shakeel Ahamad (Deputy registrar , University Delhi)



Scanned with CamScanner